# MODULE ३

## Culture and Intelligence, Prejudice and Parental Practices

## संस्कृती आणि बुध्दीमत्ता, पुर्वग्रह आणि पालकत्व शैली

**प्रा. डॉ. घनशाम कांबळे**
**विभाग प्रमुख**
**कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, इस्लामपूर**

**प्रा. डॉ. विजय माळी**
**कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, इस्लामपूर**

### ३.१. संस्कृती आणि बुध्दिमत्ता (Culture and intelligence)

१) बुध्दिमत्ता म्हणजे काय ? (What is intelligence?)
   i) बुध्दिमत्ता चाचणीद्वारे काय मोजले जाते ? (What is measured by intelligence tests?)
२) बुध्दिमत्तेचे स्वरुप : अनुवंशिक गृहितकानुसार (The 'nature' of intelligence: the heritability hypothesis)
३) बुध्दिमत्तेचे स्वरुप : पर्यावरणीय-सांस्कृतिक गृहितक (The 'nurture' of intelligence : the environmental cultural hypothesis)
४) संस्कृती विरहित बुध्दिमत्ता चाचणी (Can intelligence tests be culture-fair?)
५) स्वदेशी बुध्दिमत्ता (Indigenous intelligence)-
६) दैनंदिन बुध्दिमत्ता आणि बोधनिकता (Everyday intelligence and cognition)

### ३.२. संस्कृती आणि पूर्वग्रह (Culture and prejudice)

१) पूर्वग्रह विषयक सामाजिक मानसशास्त्रीय मुळ सिध्दांत (Social psychological theories on the origins of prejudice)
   i. न्युनतम समूह सिध्दांत (Minimal groups theory (Tajfel, १९८१))
   ii. संपर्क गृहितक (Contact hypothesis) (Allport, १९५४)
   iii. सामाजिक वर्चस्व सिद्धांत (Social dominance theory (Sidanius & Pratto,१९९९))
   iv. वास्तववादी संघर्ष सिध्दांत (Realistic conflict theory (Sherif, १९६६))
   v. ऐतहासिक प्रतिनिधीत्व सिध्दांत (Historical representation theory (Liu et al., २००३))

२) पूर्वग्रह सिध्दांताबाबत जागतिक पाठिंबा सिध्दांत : किमान समूह, संपर्क, सामाजिक वर्चस्व, वास्तवतावादी संघर्ष (Global support for theories of prejudice: Minimal groups, Contact, Social dominance, realistic conflict) -
   i. किमान समूह
   ii. संपर्क
   iii. सामाजिक वर्चस्व
   iv. वास्तववादी संघर्ष

### ३.३. संस्कृती आणि पालक पध्दती (Culture and parenting practices)-

१) पालकत्वाबाबत सांस्कृतीक भूमिका : (Cultural variations in parenting: bedtime, playtime, doing as you're told)
२) पालकत्वामध्ये सांस्कृतिक समानता (Cultural commonalities in parenting)
३) सांस्कृतिकदृष्ट्या भिन्न पालक शैली आणि Ethno सिध्दांत (Diverse Parental Styles and ethno theories)
४) द्विमार्गी पालकत्व : स्वभावाची भूमिका (Parenting is a two-way street: the role of temperament)

# MODULE ३

# Culture and Intelligence, Prejudice and Parental Practices

# संस्कृती आणि बुध्दीमत्ता, पुर्वग्रह आणि पालकत्व शैली

## ३.१. संस्कृती आणि बुध्दिमत्ता (Culture and intelligence)

### a) What is intelligence? बुध्दिमत्ता म्हणजे काय ?

बुद्धिमत्तेची व्याख्या विविध प्रकारे केली जाते. उदा- बुद्धिमत्तेचे वर्णन मानसिक क्षमतेचा एक संच म्हणून केले जाऊ शकते, ज्ञान घेणे आणि वापरण्याची क्षमता, समस्या सोडवण्याची कौशल्ये आणि जगाबद्दलचे ज्ञान, विविध कार्ये पार पाडण्याची क्षमता किंवा एक कौशल्य जे आम्हाला समजण्यास, परिस्थितीशी जुळवून घेण्यास, शिकण्यास, तर्क करण्यास आणि अडथळ्यांना पार करण्याची अनुमती देते. प्रथम, बहुतेक परिभाषांमध्ये "ज्ञान" हा शब्द समाविष्ट असतो. मग, बहुतेक परिभाषा समस्येचे निराकरण करण्याकडे लक्ष वेधतात, ज्यामुळे असा समज होतो की बुद्धिमत्ता ही मानसिक कौशल्यांचा एक समूह आहे जी व्यक्तींना लक्ष्य गाठण्यासाठी मदत करते.

आपण कसे वागावे याबाबतच्या आपल्या कल्पना या मित्र तसेच कुटुंबातील लोकांपेक्षा भिन्न प्रकारच्या असू शकतात. मानसशास्त्र आणि विविध सांस्कृतिक संदर्भांमध्ये बुद्धिमत्तेची विविध रचना या शब्दाचे स्वरुप दर्शविले आहे. बऱ्याच मानसशास्त्रज्ञांनी बुद्धिमत्तेच्या अर्थाबद्दल वेगवेगळया स्वरुपातील आपले मत व्यक्त केले आहे. ब्रिटीश लेखक चार्ल्स स्पीयरमॅन (१९०४) यांनी सर्वसाधारण बुद्धिमत्तेची कल्पना अंतर्भूत केली आहे. विचार आणि कृती या घटकाशी बुध्दीमत्ता संबंधीत असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. यूएस मध्ये लुई थर्स्टोन (Louis Thurstone (१९३८)) यांनी सात प्राथमिक मानसिक क्षमता म्हणजेच मॉडेलिंग इंटेलिजेंस modelled intelligence (primary mental abilities (PMAs)) (पीएमए) याचा अभ्यास केला. यामध्ये ज्ञानेंद्रियांचा वेग, स्थानिक क्षमता आणि संख्या यांचा समावेश आहे. गार्डनर (Gardner (१९८३)) यांनी अनेक असंबंधित घटकांमधे राहणारी बहुविध बुद्धिमत्तांची कल्पना पुन्हा समोर आणली. इतरांना ओळखणे तसेच स्वतःला जाणून घेणे अशा प्रकारच्या क्षमता समाविष्ठीत करण्याकरिता पूर्णपणे संज्ञानात्मक स्पर्धांच्या पलीकडे बुद्धिमत्तेचा विस्तार करण्यात आला आहे.

स्टर्नबर्ग यांनी बुद्धिमत्तेच्या बहुआयामी संरचनेविषयी एका कल्पनेचे समर्थन केले आणि बुद्धिमत्तेच्या तीन मूलभूत बाबींचे अस्तित्व सुचविले त्याम्हणजे विश्लेषक, सर्जनशील आणि व्यावहारिक. त्यांच्या

युक्तिवादानुसार, बहुतेक बुद्धिमत्ता चाचण्यांमध्ये केवळ विश्लेषणात्मक कौशल्ये मोजली जातात. चाचणीतील विश्लेषणात्मक समस्या सहसा स्पष्टपणे परिभाषित केल्या जातात. व्यावहारिक समस्या सहसा स्पष्टपणे परिभाषित केल्या जात नाहीत. या समस्यांचे यशस्वीरित्या निराकरण करण्यासाठी, त्या व्यक्तीला दररोजचे अनुभव आणि तोडगा शोधण्यासाठी पुरेसे प्रवृत्त करणे गरजेचे आहे.

**What is measured by intelligence tests? बुध्दिमत्ता चाचणीद्वारे काय मोजले जाते ?**

बुद्धिमत्ता चाचण्या या बुध्दीमत्ता मापनाबाबत ठोस उपाय असल्याचे काहीजण गृहित धरतात . विसाव्या शतकाच्या सुरूवातीस पहिली बुद्धिमत्ता चाचणी विकसित केली गेली. (Binet & Simon, १९०५)चाचणी गुणांमधील फरक अनुवांशिक बौद्धिक क्षमता आणि वंश यांच्यातील परस्परसंबंध पुरावा म्हणून वर्णन केले गेले आहे. तसेच वेगवेगळया गटांवर करण्यात आलेल्या अभ्यासानुसार असे दिसून आले की, वैयक्तिक बुद्धीव्यतिरिक्त इतर घटकांचे मापन चाचणी दरम्यान केले जात आहे.

पहिल्या महायुद्धा दरम्याणच्या काळामध्ये रॉबर्ट यर्क्स यांनी तीन स्वतंत्र चाचण्या तयार करून जवळपास १.७५ दशलक्ष अमेरिकन सैनिकांची भरती केली होती. 'आर्मी अल्फा' चाचणी साक्षर भरतीसाठी तयार केली गेली होती.'आर्मी बीटा' चित्रमय चाचणी होती आणि अल्फा अयशस्वी झालेल्यांसाठी बनविण्यात आली होती. Herrnstein and Murray (१९९४) यांनी सांस्कृतिक ज्ञान असणाऱ्या घटकांचा समावेश करुन बुद्धिमत्ता चाचणी आफ्रिकन अमेरिकन किंवा युरोपियन अमेरिकन लोकांसाठी फरक दर्शवते का याचा विचार केला. सांस्कृतिक बाजूचा परिणाम न होता बुद्धिमत्तेला एक वेगळा घटक म्हणून मोजता येते की नाही याविषयीचे प्रश्न संबंधित आहेत. बौद्धिक क्षमतेत अनुवंशीक वारसा किती मिळतो आणि संस्कृतिचा किती संबंध आहे या विषयावरील संशोधन महत्वाचे आहे.

**B. बुध्दिमत्तेचे स्वरुप : अनुवंशिक गृहितकानुसार (The 'nature' of intelligence: the heritability hypothesis)-**

वेगवेगळ्या सांस्कृतिक पार्श्वभूमीवरील समूहांवरील बुद्धिमत्ता चाचणी गुणांमधील सरासरी फरक कायम असलेला दिसून येतो. अमेरिकेत काही अल्पसंख्याक गट युरोपियन वंशांपेक्षा १५% पेक्षा मागे असल्याचे दिसून आले. (Matsumoto & Juang, २००४).अनुवंशीक वारसा, सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक घटक यांच्या मिश्रणामुळे किती फरक आहे? अशा प्रश्नांनी चाचणी प्रशासन करणाऱ्यांची विभागणी केली आहे. हर्न्सटिन आणि मरे (१९९४) यांनी असा युक्तिवाद केला की सामाजिक पात्रतेसाठी एखाद्या व्यक्तीच्या स्थितीचा अंदाज

लावण्याचा उत्तम मार्ग म्हणजे बुद्धिमत्ता चाचणी होय. चाचणी गुणांकाच्या सामान्य वितरण वक्रावर त्यांची स्थिती निश्चित करण्यात येते याला त्यांचे बुद्ध्यांक गुणांक म्हणता येईल. थोडक्यात, आपल्याला पुढे जायचे असल्यास, उच्च बुद्ध्यांक मिळवा. या युक्तिवादानुसार बुद्धिमत्ता पुढील घटकानुसार सांगता येईल. **सामान्य** (एक अविभाजीत जी, बुद्धीचे सर्व पैलू व्यापून टाकते), **अचल** (शिक्षण किंवा प्रशिक्षणाद्वारे अपरिवर्तनीय असणारी) आणि **संस्कृती पासून अलिप्त** (सांस्कृतिक ज्ञान किंवा अनुभवाने अप्रभावित).

जुळ्या मुलांच्या अभ्यासावरील गुणांकाद्वारे बुद्धिमत्तेच्या अनुवांशिक घटकाबद्दलचे अनुमान निघडीत आहे. वेगवेगळ्या वातावरणात वाढलेल्या जुळया मुलांपेक्षा एकाच वातावरणामध्ये वाढलेल्या जुळयांपेक्षा बुध्दीमत्ता गुणांक अधिक असल्याचे दिसून आले (Bouchard & McGue, १९८१). अनुवांशिकतेशी चाचणी गुणांकाचा परस्पर संबंध असल्याचे अनेक प्रसंगानुसार दिसून आले आहे. (Newman et al., १९३७; Shields, १९६२). तरीही, जुळ्या मुलांच्या अभ्यासावरून तीन गोष्टींवर टीका केली गेली आहे.

- विसंगति : एकाच अध्ययनामध्ये विभिन्न भाग घेतलेल्या लोकांसाठी गुणांक देण्यासाठी काही वेळा वेगवेगळया चुकीच्या परिक्षणाचा उपयोग करण्यात आला आहे
- शब्दार्थ : वेगवेगळया अभ्यासामध्ये (बर्च एंड हेवर्ड, १९९४) विभिन्न परिभाषाचा उपयोग करण्यात आला आहे. जुळया मुलांमध्ये कदाचित वेगवेगळया वातावरणामध्ये किंवा संस्कृतीमध्ये वाढलेले असू शकतात.
- आपणास असे दिसून येईल की, मिळालेल्या निष्कर्षांचा उपयोग प्रकृतिक आणि पोषण दोन्ही तर्कांचे समर्थनासाठी केला जावू शकतो. यामध्ये बदल होणे गरजेचे आहे.

## C. बुध्दिमत्तेचे स्वरुप : पर्यावरणीय-सांस्कृतिक गृहितक (The ‘nurture’ of intelligence : the environmental—cultural hypothesis)

जे लोक सांस्कृतिक आणि और पर्यावरणीय प्रभावावर प्रकाश टाकतात त्यांच्या मते, सांस्कृतिक गटांमध्ये वेगवेगळी उपलब्धि असल्याचे दिसून येते. तसेच बुध्दीमत्ता अनेक स्पटीकरुपी (crystallised) घटकांपासून बनलेली आहे. (Cattell, १९७१; Cavanaugh & Blanchard Fields, २००६) बुद्धि (Fluid intelligence) मध्ये सांस्कृतिक पार्श्वभूमीचा प्रभाव म्हणून 'मानसिक प्रगल्भतेच्या रुपात सामिल होणे आणि ती आपणाला अधिग्रहीत ज्ञान, सांस्कृतिक पृष्ठभूमि किंवा अनुभव याच्याशिवाय प्रभावीपणे तर्क करण्यासाठी उपयोगी पडत असते. स्फटीकरुपी बुध्दिमत्ते (Crystallised intelligence) मध्ये बौद्धिक गतिविधि, ज्ञान आणि

अनुभव यांचा समावेश असल्याचे दिसून येते. यामुळेच वातावरण तसेच सांस्कृतिक पार्श्वभूमी यांचा परिणाम बुध्दीमत्तेवर दिसून येतो.

सामाजिक समूहांच्या सदस्यांची कमी अपेक्षा असलेला एक घटक सांगता येईल की जो वेगळ्या कर्तृत्वामध्ये गुंतलेला असला तरीही संज्ञानात्मक गुणांकामध्ये कमी दिसून आला आहे. ज्याप्रमाणे शाळेमधील मुलांची प्रगती अशा मुलांमध्ये कमी दिसून येते की ज्यांना कमी बुध्दीमान किंवा ढ मुले असे लेबल लावले गेलेले असते. जेव्हा उत्तरदात्यांना स्पष्टपणे आठवण करून दिली जाते की ते अशा गटातले सदस्य आहेत की जे वारंवार अयशस्वी होतात त्यावेळी लेबलिंगचा प्रभाव बोधात्मक परीक्षणांच्या गुणांकावर झालेला दिसतो. (Seaver, १९७३). कृष्णवर्णीय विश्वविद्यालय (Black university) मधील मुलांमध्ये परिक्षणावेळी सांगण्यात आले की, प्रश्नावली वरील माहिती भरतेवेळी आपल्या जातीयताचे वर्णन करावयाचे आहे. अशा मुलांचा गुणांक हा जातीयतेचे वर्णन न केलेल्या समूहाच्या तुलनेत कमी असलेला दिसून आला(Steele & Aronson, १९९५).

वरील संशोधनावरुन असे दिसून येते की बौद्धिक संभाव्यतेचे नियमितपणे काही सांस्कृतिक गटांमधील व्यक्तींच्या कार्यावर कोणताही परिणाम होत नाही हे स्पष्ट करण्यासाठी अनेक पर्यावरणीय घटकांचा वापर केला जाऊ शकतो. सर्वसामान्यपणे असे सुचवले गेले की लोकांकडून स्वत:च्या बुद्धिमत्तेकडे दुर्लक्ष केले जाते तेव्हा लोक बुद्धिमत्ता चाचणींवर कमी गुण मिळवतात. अशा परिस्थितीत जी चाचणी घेतली जाते बुद्धिमत्ता चाचणी गुणांक जर नव्हे तर बुद्धिमत्तेची आवृत्ती आहे जी अप्रत्यक्षपणे प्रतिकात्मक संस्कृतीशी जोडलेली आहे. काहीवेळा या चाचण्यांमध्ये यथार्थता असल्याचे दिसून येत नाही कारण त्या बुद्धिमत्तेचे मापन करताना सांस्कृतिक अर्थ, ज्ञान आणि भाषा याविषयी वेगवेगळे प्रभाव दाखवत असतात. (Greenfield, १९९७)

### D. संस्कृती विरहित बुद्धिमत्ता चाचणी (Can intelligence tests be culture-fair?)

संस्कृतीच्या आणि बुद्धिमत्तेचे मापन करण्याच्या प्रयत्नांमध्ये चाचणी घेण्यात येत असताना आणि चाचण्या तयार करताना सामायिक सांस्कृतिक संकल्पनेच्या अनुशंगाने विचार करणे गरजेचे आहे (Greenfield, १९९७). पुर्व अनुभवाने हे सिद्ध केले आहे की ज्यांच्या पालकांची बुध्दीमत्ता चांगली आहे त्यांना त्याचा एक वेगळा फायदा मिळतो. असे असूनही, संस्कृती योग्य बुद्धिमत्तेच्या निरपेक्ष चाचण्या करण्याचा प्रयत्न केला गेला पाहिजे. बुध्दिमत्ता चाचण्या या सांस्कृतिक ज्ञानावर अवलंबून न राहता बुद्धिमत्तेचे मूल्यांकन करण्यासाठी डिझाइन केल्या जातात, बहुतेक वेळा असामान्य प्रश्नांचा वापर यामध्ये करणे गरजेचे असते. Cattell and Cattell's Culture Fair Series (१९७३) यांनी तयार केलेल्या पेपर पेन्सिल चाचण्यांमध्ये आकृत्या आणि वेगवेगळया आकारांचा समावेश करण्यात आला आहे. अशा चाचण्या बुद्धिमत्ता चाचणीमध्ये जाती भेद कमी करण्याच्या अनुशंगाने तयार

केल्या आहेत. Nisbett (२००३) यांनी एक अभ्यास केला ज्यामध्ये चिनी आणि अमेरिकन समूहांवर कॅटल यांच्या चाचणीचा वापर करण्यात आला. बुध्दिमत्तेशी निगडीत (such as memory speed) गुणांकन एकसारखे असल्याचे दिसून आले. संस्कृतीशी निगडीत असणाऱ्या चाचणीपेक्षा कॅटल यांच्या चाचणी गुणांकन योग्य असल्याचे दिसून आले.संस्कृतीचा गुणधर्म कमी करुन अर्थपूर्ण अशी चाचणी प्रश्नावली तयार करणे एक आव्हाणात्मक कार्य आहे.

E. **स्वदेशी बुध्दिमत्ता (Indigenous intelligence)-**

संस्कृतीचा प्रभाव कमी करुन चाचण्या तयार करण्याचा पर्याय म्हणजे बुद्धिमत्ता स्वतःला वेगवेगळ्या सांस्कृतिक सेटिंग्जमध्ये वेगळ्या प्रकारे कसे प्रकट करते हे तपासणे.आपण कोणत्या संस्कृतीमधून आलो याचा परिणाम आपल्या विचारांवर तसेच गुणांचे आकलन करण्याच्या विश्वासार्हतेवर होतो. संस्कृतीक प्रदर्शन संकल्पना आणि बुध्दीमत्ता यांचा संबंध घेणे काही मानसशास्त्रज्ञांनी टाळले आहे. त्यांनी आता बुध्दीमत्तेच्या स्वदेशी संकल्पना वापरण्यावर अधिक भर दिल्याचे दिसते. सांस्कृतिकदृष्ट्या सापेक्षतावादी माहिती जाणून घेण्याकरिता वेगळया प्रकारे नियोजन करणे आवश्यक आहे कारण त्या स्वतंत्र सांस्कृतिक घटकांमध्ये वेगळया स्वरुपात दिसून येतात. उदाहरणार्थ, इंग्रजी भाषिक जे शब्द वापरतात त्या अर्थाने कॅनेडियन समुदायाच्या सदस्यांची Smart or Intelligence देशी संकल्पना समजून घेण्यासाठी मुलाखत घेण्यात आली.(Berry & Bennett, १९८९). निकटवर्ती समकक्ष म्हणून उद्भवलेले गुणधर्म म्हणजे शहाणे, आदरणीयआणि चौकस या संकल्पना आहेत.विशेष म्हणजे बुद्धिमत्तेच्या उलट प्रतीक असलेली गुणवत्ता म्हणजे ''living like a white' ('धूर्त' किंवा 'बढाईखोर' म्हणून पाहिले जाते).ही संकल्पना असे सुचित करते की, बुद्धिमत्तेच्या संकल्पनेत सर्वसंस्कृतीमध्ये सहमत असू शकत नाही.

F. **दैनंदिन बुध्दिमत्ता आणि बोधनिकता (Everyday intelligence and cognition)**

बुद्धिमत्तेची तपासणी करणारे जागतिक मानसशास्त्रज्ञ ज्ञान आणि कौशल्य कसे आहे यावर लक्ष केंद्रित करून वास्तवतावादी दृष्टीकोन शोधण्याचा प्रयत्न करतात. परिणामी त्यांना अपेक्षित असलेल्या गोष्टी सर्वसाधारण घटकांमध्ये दिसून येत नाहीत. त्याऐवजी, योग्यता आणि कार्यक्षमता शोधली जाते तिथे आपल्यातील बहुतेक लोक सर्वात बुद्धिमान कृती करण्याचा दावा करतात. Arch relativist Cole (१९९२) असे सूचित करते की बुद्धिमत्तेची ओळख सार्वत्रिकपणे प्रशासित केलेल्या चाचण्यांच्या परिणामामध्ये नव्हे तर सांस्कृतिक दृष्ट्या वैविध्यपूर्ण पद्धतींमध्ये दर्शविली जाते.

मापण केलेल्या बुध्दीमत्तेच्या गुणांकापेक्षा बुध्दीमत्ता ही अनेक घटकांवर अवलंबून असते. स्टर्नबर्ग (2002). औपचारिक चाचणी बाहेरील बुद्धिमत्ता ही विशिष्ट प्रकारच्या सांस्कृतिक घटकांमध्ये अनुकूलता सिद्ध करणाऱ्या तज्ञांच्या वैचारिकतेमध्ये त्रासलेली दिसते. जागतिक मानसशास्त्रज्ञांनी रोजच्या अनुभूतीमधील मुख्यत: सांस्कृतिक मानसशास्त्र दृष्टीकोनातूनअसंख्य बाबींचा अभ्यास केला आहे.बुद्धिमत्तेचे सांस्कृतिक आणि दैनंदिन पैलू स्पिअरमनच्या सुरुवातीच्या अभ्यासामध्ये दिसून आले नाहीत. नंतरच्या अभ्यासामध्ये त्याचा प्रभाव जास्त आढळला. स्टर्नबर्ग यांनी प्रभावशाली बुध्दीमत्ते संदर्भात तीन मुद्दे सांगितले आहेत. (Sternberg's theory of successful intelligence) स्वतःच्या सांस्कृतिक घटकां संदर्भात वैयक्तिक मानदंड बाबतीत यशस्वी होऊ शकतात. सामर्थ्यांचा योग्य वापर करुन आणि आपल्या कमकुवतपणाची भरपाई करता येते. विश्लेषणात्मक, सर्जनशील आणि व्यावहारिक क्षमतांचे संतुलन साधून यशस्वी होता येते. अनुकूल वातावरण आणि क्षमता यांची मदत बुध्दीमत्तेला योग्य आकार देण्यास होत असल्याचे दिसून येते.

## ३.२. संस्कृती आणि पूर्वग्रह (Culture and prejudice)

### a. पूर्वग्रह विषयक सामाजिक मानसशास्त्रीय मुळ सिध्दांत (Social psychological theories on the origins of prejudice)

जर आपण मूळ संस्काराचा तसेच पूर्वग्रहाचा आपल्या स्वतःच्या वर्तनावर प्रभाव पाडतो आणि आपल्या यशाचे आणि अपयशाचे श्रेय देतो त्याचप्रमाणे आपल्या सोबत असणाऱ्या व्यक्तींप्रती आपला दृष्टिकोन तयार झालेला दिसून येतो. यावरुन एखाद्या समूहाबरेबर संबंध प्रस्थापित करणे अथवा ते नाकारणे हे त्या व्यक्तींमधील असणारे पूर्वग्रह म्हणून ओळखले जाते.

सामाजिक मानसशास्त्रामध्ये विशिष्ट सामाजिक गटांबद्दल दृष्टिकोन उत्पत्तीसाठी अनेक घटक कारणिभूत असल्याचे सगितले आहे. याविषयी काही संस्कृतीमध्ये संशोधन करण्यात आले आहे. असे दिसून येते की, काही प्रमाणामध्ये संस्कृती या सर्व घटकांसाठी कारणीभूत असते. पूर्वग्रह निर्मितीस मदत करणारे काही सामाजिक मानसिक सिध्दांत पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**न्युनतम समूह सिध्दांत (Minimal groups theory (Tajfel, १९८१)) -**

सामाजिक ओळख आणि पूर्वग्रह याचा पडताळा पाहण्यात आला. हा सिद्धांत असा युक्तिवाद करतो की एका समूहातील व्यक्तींच्या गुणधर्मांची तुलना ही दुसऱ्या समूहाशी करत असताना समूह विषयक पूर्वग्रह कोणत्या प्रकारचे आहेत यावर अवलंबून असते. बाहेरील समूहांविरूद्ध पूर्वग्रहभेद हे गटांमधील अंतर्गत फरक

समजल्यामुळे उद्भवतात असे दिसून येते. उदा. फुटबॉल सामन्यावेळी एखादा प्रेक्षक एका खेळाडूंच्या गटास समर्थन देत असतो व दुसऱ्या गटाविरोधी मत व्यक्त करत असताना दिसून येतो. यामागे प्रत्येक खेळाडूंच्या समूहाबाबत प्रेक्षकांचा असणारा पूर्वग्रह दृष्टीकोण दिसून येतो.

**संपर्क गृहितक (Contact hypothesis) (Allport, १९५४) -**

सामाजिक समूहामधील संपर्काचा अभाव हा नकारात्मक अंतर समूह दृष्टिकोण निर्मिती मध्ये महत्वाचा मानला जातो. सामाजिक गटांमधील परस्पर संपर्क नसणे हे नकारात्मक समूह-वृत्तीच्या विकासाशी संबंधित आहे. परस्परविषयी अज्ञान कमी करण्याच्या हेतूने संपर्क वाढल्यामुळे वैमनस्य कमी होईल. सामाजिक गटांमध्ये अर्थपूर्णता येण्यासाठी, परस्परांमध्ये असणारे संबंध हे समान दर्जाचे असणे गरजेचे आहे. (जेथे एका गटावर दुसऱ्याचा अधिकार नसने), सक्षम नसलेले, अतिशयोक्तीपूर्ण उद्दीष्ट असणारे (दोन्ही पक्षांनी योग्यप्रकारे निर्माण न केलेले) अशा प्रकारचे संबंध हे परस्परांविषयी अज्ञान निर्माण करण्यात महत्वाची भूमिका बजावतात. उदाहरणार्थ: मी एखाद्या गटाची जीवनशैली आणि मूल्यांकडे पूर्णपणे दुर्लक्ष करीत असेन तर त्या गटाविषयी आपल्या मनामध्ये असमानता निर्माण झालेली दिसून येते, तसेच पूर्वग्रहदूषित मत निर्माण होते.

**सामाजिक वर्चस्व सिद्धांत (Social dominance theory (Sidanius & Pratto,१९९९))-**

पूर्वाग्रह हा सामाजिक गटांमधील वेगवेगळया स्थितीशी संबंधित आहे. आपले वर्चस्व सिध्द करण्यासाठी उच्च-स्तरीय गट सहसा सामाजिक वर्चस्व अभिमुखता (social dominance orientation (एसडीओ) अवलंबतात. एसडीओ बाहेरील गटांविरूद्ध गट-ओळख आणि पूर्वग्रहांना प्रोत्साहन देतात. विशेष म्हणजे निम्नस्तरीय गटांद्वारे सामाजिक वर्चस्व अभिमुखता वृत्ती इतर गटांकडून घेण्याचा प्रयत्न झालेला दिसून येतो. यासर्वांचा परिणाम म्हणून गटां गटातील सदस्यांमध्ये मतांतरे निर्माण झाल्याचे दिसून येते. उदाहरणार्थ: मला आमच्या गटाच्या चांगल्या स्थितीचे इतर गटांच्या तुलनामध्ये रक्षण करावयाचे आहे म्हणून मी इतर गटाविषयी पूर्वग्रहदूषित आहे.

**वास्तववादी संघर्ष सिध्दांत (Realistic conflict theory (Sherif, १९६६))-**

आपण ज्या गटाचे सदस्य आहोत त्यामधील काही लोक आपल्या गटापासून वेगळ्या गटाशी संबंधित आहे हे जाणून घेणे हे एक पूर्वग्रह बाळगण्याचे कारण असू शकते, परंतु समूहाची उदिष्ट्ये ठरवत असताना दुसऱ्या समूहाची वैशिष्ठ्यांशी तुलना केली जाते. ज्यावेळी समूहामध्ये स्वारस्य निर्माण करण्यामध्ये संघर्षात्मक परिस्थिती निर्माण होते आणि त्यामधून पुर्वग्रह निर्माण होण्यास मदत होते. उदा. जेंव्हा दोन समूहामध्ये एकसारख्या

गोष्टींचे वितरण होणार असेल आणि त्याची उपलब्धता कमी प्रमाणात असेल तर दोन्ही समूहामध्ये एकमेकांविषयी पुर्वग्रह निर्माण होत असलेले दिसून येते.

**ऐतहासिक प्रतिनिधीत्व सिध्दांत (Historical representation theory (Liu et al., २००३))-**

सांस्कृतिक मानसशास्त्राच्या दृष्टीकोनातून इतिहासाच्या प्रतिनिधित्वामुळे आंतरसमूहामध्ये पूर्वाग्रह निर्माण होत असलेले दिसतात. जमिनीच्या दाव्यांवरून किंवा मानवी हक्कांच्या उल्लंघनांवरील भूतकाळातील वाद-विवाद अशा प्रकारे सध्याच्या मनोवृत्तीवरुन सूचित होते. काहीवेळा सुसंवाद हाच आंतरसमूह सुधारण्यास मदत करतात. उदा. एखाद्या जमिनीच्या पुर्वीच्या वादामूळे एका समूहामध्ये दुसऱ्या समुहाविषयी पुर्वग्रह निर्माण होत असलेले दिसून येते.

**b. पूर्वग्रह सिध्दांताबाबत जागतिक पाठिंबा सिध्दांत : किमान समूह, संपर्क, सामाजिक वर्चस्व, वास्तवतावादी संघर्ष (Global support for theories of prejudice: Minimal groups, Contact, Social dominance, realistic conflict) -**

**किमान समूह** - औद्योगिक देशांमधील (Tajfel-like experiments) संशोधनानुसार अमेरिका, जर्मनी और नेदरलैंड मध्ये समूहावर आधारीत पूर्वग्रहांचा प्रभाव आणि यूके, आयरलैंड और स्विझरलैंड मध्ये लहान समूहांमधील प्रभावांबरोबर सांस्कृतिक अंतरांमूळे निर्माण होणारे पुर्वग्रह यांचा अभ्यास करण्यात आला. विशेष म्हणजे, गटातील पक्षपात हा लहान गटात दिसून आला नाही. यामध्ये बऱ्याचदा बाह्य घटकांचा पक्षपात असलेले दिसून आले, जो प्रत्यक्षात सामाजिक वर्चस्व सिद्धांताला समर्थन देतो. लहान गटाच्या प्रभावातील सांस्कृतिक फरक प्रतिकृतींच्या द्वारे दिसून येतो.

**संपर्क-** काही समूहांमध्ये इतरांची उपस्थिती देखिल मनाला हवी हवीशी वाटते. ऑलपोर्ट यांनी मांडलेल्या कल्पनेनुसार सांस्कृतिक मानसशास्त्रामध्ये याविषयी संशोधन झालेले दिसते. काम करण्याचे ठिकाण, शाळा तसेच प्रयोगात्मक प्रयोगशाळा यामध्ये विभिन्न सांस्कृतिक परिस्थितीनुसार संशोधन करण्यात आला. संपर्काचा प्रभाव तपासण्यात आला यावरुन असे दिसून आले की, चांगले अंतर-समूह संपर्क पूर्वाग्रह कमी करण्यासाठीच्या प्रयत्नामध्ये एक महत्वपूर्ण घटक आहे. यांसारखे अनेक विश्वव्यापी संघटनांनी अंतरसमूह सुधारण्यासाठी निर्माण करण्यात आलेले मार्ग अवलंबण्याची गरज आहे. उत्तरी आयरलैंड मधील कैथोलिक आणि प्रोटेस्टेंट समुदायमध्ये अशा प्रकारे प्रयत्न करण्यात आले. तरीही शिक्षण, खेळ,निवास या क्षेत्रांमध्ये अशा प्रकारच्या प्रयत्नांच्या शिवाय वेगवेगळया प्रांतामधील अधिकांश नागरिक वेगवेगळया समूहांसोबत मिळूनमिसळून व्यवहार करणे पसंत करत

असतात. याशिवाय असे दिसून येते की, अंतर समूह मित्रता ज्याठिकाणी उपलब्ध असेल तेथे बाहेरील समूहिषयी असणाऱ्या दृष्टीकोणामध्ये बदल होत नसतात.

**सामाजिक वर्चस्व-** सामाजिक वर्चस्व अभिमुखते (social dominance orientation एसडीओ) मध्ये उच्च-स्तरीय गटांचा समावेश करण्यात आला आहे, जे त्यांच्या उच्च आणि प्रगत सामाजिक स्थानासाठी तथाकथित न्यायनिवाडा करतात. उदा. मी या पदावर आहे कारण की मी या पदाच्या लायक आहे, असे मत समूहामध्ये निर्माण झालेले दिसून येते. खरोखर, हा सिद्धांत शक्तिशाली आणि तुलनेने शक्तीहीन गटांना अंतर्गत स्वरुपानुसार ओळखण्याची शक्यता निर्माण करतो. उदाहरणार्थ, निम्न-स्थितीतील गटांच्या अपयशासाठी गटामधील अंतर्गत स्वरूपाचे कारणीभूत असल्याचे मानले जाते. पूर्वग्रह आणि स्थानिक पातळीवर तयार केलेल्या उपायांचा वापर करून, Pratto et al. (२०००) यांनी कॅनडा, इस्त्राईल आणि थायलंडमध्ये या गृहितकची चाचणी केली. यानुसार उच्च आणि निम्न-स्तरीय गटांना ओळखत असताना त्यांच्या अधिकार तसेच शक्तीनुसार ओळखले गेले. अशावेळी निम्नस्तरीय गटांकडून बाहेरील चांगल्या गटांकडे आकर्षीत होण्याची इच्छा समूहामधील सदस्यांमध्ये निर्माण होत असलेली दिसून येते.

Levin et al. (२००३) यांच्या संशोधनामध्ये सहभागींना विचारण्यात आले की, ते २००१ मध्ये वर्ल्ड ट्रेड सेंटरवरील हल्ल्यांना पाठिंबा दर्शवित आहेत की नाही. हल्ल्यांना पाठींबा देणाऱ्यांमध्ये सामाजिक वर्चस्व अभिमुख समूह दिसून आले. यावरुन हे सुचित होते की, अतिशय शक्तीशाली समजल्या गेलेले देशांपैकी एक युनायटेड स्टेटस (US) आहेत. अशा शक्तीशाली सामर्थ्यावर हल्ले केलेल्यांबद्दल काही समूहांमध्ये सहानुभूती असलेली दिसते.

**वास्तववादी संघर्ष-** शेरीफ (Sherif's hypothesis) यांच्या संकल्पनेच्या मते, ज्या ठिकाणचे समूह भौतिक संसाधनांवर किंवा तत्सम मूल्यांवर अतिक्रमण करीत असल्याचे पाहिले जाते तेथे आंतरसमूहामधील पूर्वग्रह तीव्र होताना दिसतात. उदाहरणार्थ, युरोपियन युनियनच्या नागरिकांना ज्यांची संसाधने आणि मूल्ये त्यांच्यात द्वेषबुद्धीचा अर्थ जातीय बहिष्कृत असा करण्यात आला. जॅक्सन (२००१) यांच्या मते पुर्वग्रहाचा उच्च पातळीशी सहसंबंध असल्याचे सांगितले आहे. धोक्याच्या भावनेमूळे अमेरिकेतील मेक्सिकन लोकांविरूद्ध प्रवास करण्यावरही निर्बंध लावण्यात आले होते. यूरोपीय किंवा अमेरिकी नमून्यांमध्ये वेगवेगळया सांस्कृतिक घटकांचा अनुभव घेण्यात आला, त्यामध्ये बाहेरील समुहापासून धोक्याची पातळी कशा प्रकारे प्रभावित होते ते पाहण्यात आले. उदाहरणार्थ, जॅक्सन यांच्या सर्वेक्षणात, मूळच्या फ्रेंच लोकांपेक्षा बाहेरुन कायमचे वास्तव्य करण्यासाठी

येणाऱ्या समूहांवर जास्त प्रमाणात निर्बंध लादलेले दिसत होते. परदेशामधून वास्तव्यासाठी येणाऱ्या व्यक्तींची संख्या कमी करणे हा यापाठीमागील हेतू होता.

## **३.३. संस्कृती आणि पालक पध्दती (Culture and parenting practices)-**

एका जुन्या म्हणीच्या प्रमाणे काही लोकांना स्वत:हून आणले जाते तर काही लोकाना ओढून आणले जाते. अशा प्रकारेच काही संस्कृतीमध्ये मुले ही मोठी होत असतात तर काही संस्कृतीमध्ये दुसऱ्यांकडून त्यांना मोठे केले जाते. (Kagitci basi, १९९६) यांच्या मते, पितृत्व भूमिका ही दोन्ही संस्कृतीमध्ये वेगवेगळया स्वरुपात कार्यरत असते. काही संस्कृती ही पारंपारीक रुपाने दुसऱ्यांच्या तुलनेत पालकत्व शैली जास्त प्रमाणात कार्यरत असलेली दिसून येते.सामाजिकरणामध्ये अशा प्रकारच्या संस्कृतीचा युवकांवर खुप मोठ्या प्रमाणात प्रभाव पडलेला दिसून येतो.

a) **पालकत्वाबाबत सांस्कृतीक भूमिका : (Cultural variations in parenting: bedtime, playtime, doing as you're told)**

सांस्कृतिक रुपात विविध पालकत्व शैली ही घरामधील शिस्तीच्या नियमांपासून बाहेर काम करण्याच्या पध्दतींपर्यंत तसेच पालकांच्याद्वारे आपल्या मुलांसाठी भविष्यात निर्माण केले गेलेल्या किंवा निर्धारित केलेल्या ध्येयाबाबत अशा अनेक प्रकारे प्रकट होत असलेली दिसून येते. पालक हे आपल्या मुलांना सामाजिक घटकांबाबत वेगवेगळ्या प्रकारे वर्तनुकीबाबत सांगत असतात.

घरातील झोपण्याच्या सवयी सांस्कृतिकदृष्ट्या भिन्न पालकत्व शैलीवर अवलंबून असतात यावरुन असे सुचित होते की, स्पॅनिश मुले रात्री उशिरापर्यंत जागे रहातात, ग्रामीण आफ्रिकन मुले मैदानी क्रिडा कला प्रकारानुसार झोपी जातात आणि जपानी मुले शाळेत जाण्यासाठी तुलनेने लवकर उठतात.उदाहरणार्थ, यूएस मधील पालक त्यांच्या मुलांना ग्रामीण युरोपियन आणि (मध्य अमेरिकन) मायान भागातील पालकांपेक्षा अधिक वेळा एकटे झोपायला प्रोत्साहित करतात.

मुले आणि मुली बाबत पालकांची झोपेच्या पध्दतीविषयीची जबाबदारी ही वेगवेगळया सस्कृतीमध्ये वेगवेगळी दिसून येते.मेक्सिको, फ्रांस आणि इटली मध्ये वडील हे अन्य राष्ट्रांच्या समूहांच्या तुलनेत खेळांच्या वेळा अधिक दिल्या असल्याचे दिसते, परंतू जर्मनमधील वडिलांच्या बाबतीत खेळाच्या वेळा या खुप कमी आणि गप्प बसवण्याची प्रवृत्ती जास्त असल्याची दिसते. (Best & Ruther, १९९४) इतरत्र पालकांच्या शिस्तीतही भिन्नता दिसून आल्या आहेत.आपल्या स्वतःच्या बालपणापासूनच आपल्याला आठवत असेल, पालकांनी

मुलांना सांगितले आहे तसे वर्तन करायला हवे म्हणून अनेक धोरणे राबविली जातात. अधिकाराच्या नावाखाली सुसंगत वर्तन करण्याची आशा केली जाऊ शकते. भावनावश गोष्टींमूळे अस्वस्थता निर्माण होईल, ‘आपण चांगले वर्तन केले नाही तर काय परिणाम होतील, काही गोष्टींना परवानगी नसते कारण त्या गोष्टीचे नियम बनवले जातात,चांगले मॉडेल उभे केले जातात कारण काही मुले काही गोष्टी करत नाहीत अशा प्रकारे प्रत्येक संस्कृतीमध्ये वेगवेगळया नियमांची निर्मिती झालेली दिसून येते किंवा वेगवेगळया संस्कृतीमध्ये अशा प्रकारची धोरणे कशा प्रकारे वापरली जातात यांचा अभ्यास केला जातो.

यावरुन असे स्पष्ट होते की, खेळांच्या वेळापासून, झोपण्याच्या वेळांपर्यंत, पालक वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या नियमांद्वारे मुलांच्यावर नियंत्रण आणताना दिसते. यथार्थपणे, पालकांमधील सांस्कृतिक भिन्नता या वेगवेगळ्या संस्कृतींमध्ये कार्यरत असणाऱ्यांसाठी आणि संपूर्ण संस्कृतीसाठी अधिक महत्वाचे मूल्य आहे. मानदंड, विश्वासार्हता आणि आचरणाच्या प्रसारांशी या सर्व गोष्टी संबंधित आहेत.तथापि, जसे आपण या गोष्टींवर संशोधन करत आहोत तसेच, पालकत्वा विषयी संस्कृतीक विषयक संशोधनात देखील बर्यायच प्रथा उघड झालेल्या दिसून आल्या आहेत.

**b) पालकत्वामध्ये सांस्कृतिक समानता (Cultural commonalities in parenting) -**

अनेक संशोधनावरुन असे दिसून आले की, जगभरातील पालकांची काम करण्याची पध्दती ही बऱ्याचअंशी समान दिसून आली. काही सामान्य परंपरा जसे मुलांच्या पालन पोषण करण्यापासून ते त्यांच्या काही क्रियाविधी पर्यंत पालक काही मोबदला न घेता सर्वकाही मुलांना देत असतात. (Konner, १९७२). फार पुर्वीपासून पाहिल्यास अंशिक रुपाने समजावून सांगितल्यास, अन्य प्राण्यांच्या तुलनेमध्ये मानवांमध्ये शिशू अवस्थेत मुले स्वत:साठी काही करु शकत नाहीत. त्याचबरोबर आणखी एक वैश्विक पालकत्व एकरुपता म्हणजे स्तनपान. नवजात मुलांना स्तनपान करणे ही गरज मानवी प्राण्यांमध्ये असते.

मुलांच्या भाषा विकासाबाबत जगभरात पालकांमध्ये एकाच प्रकारचे वर्तन दिसून येते. मातृभाषा मुलांना शिकवित असताना त्यामधील स्वरांचा चढ-उतार किंवा इतर काही गोष्टी शिकविण्याच्या पध्दती सर्व ठिकाणी समान दिसून येतात. मुले आवाजामध्ये चढ-उतार करणे, अतिरंजीत बदल करणे, काही वेळा मजेशीर आवाज काढणे, किंवा काही संदर्भहीन गोष्टींबाबत बोलत असल्याचे दिसून येते. जगभरातील मातृभाषा या वेगवेगळया प्रकारच्या आहेत. काही संस्कृतीमधील पालक मातृभाषा शिकविण्याची एक वेगळी कला दाखवून देतात. उदा.

जपानी मातांच्याकडून जास्त प्रमाणात गाणी गात किंवा संदर्भ नसणाऱ्या गोष्टींचा उल्लेख करुन भाषा शिकविण्याचा प्रयत्न करताना दिसून येतात.

सांस्कृतिकदृष्ट्या व्यापक असणाऱ्या पालकांमधील काही पैलूंना आपण ओळखू शकलो तरी संस्कृतीचे संस्कार हे वागणुकीतून देखील ओळखले जाऊ शकतील.

## c. सांस्कृतिकदृष्ट्या भिन्न पालक शैली आणि Ethno सिध्दांत (Diverse Parental Styles and ethno theories)

आजपर्यंत झालेल्या संशोधनावरुन असे दिसून येते की, विभिन्न संस्कृती मधील माता पिता हे आपल्या मुलांच्या पालणपोषणा बाबत, मुलांचे संरक्षण करण्याबाबत तसेच त्यांच्या वेगवेगळया सवयींबाबत वेगवेगळयाप्रकारे भूमिका पार पाडतात. Baumrind (१९७१) यांनी पालकत्वाच्या तीन शैली वेगवेगळया भागानुसार विभाजीत केल्या आहेत. हुकूमशाही वादी पालक उच्च पातळीवरील आज्ञाधारकपणा आवश्यक असणारी वृत्ती. अनुज्ञेय: व्यक्तीला त्याच्या स्वायत्ततेस अनुमती देते. आधिकारिकवादी पालक : निपक्ष वृत्तीने थोडेसे भितीदायक वातावरण निर्माण करणे.

या सगळया वृत्तींना एक व्यापक रुपानुसार पाहिल्यास स्वस्थ, स्थिर तसेच मुलांच्या विकासाच्या प्रक्रियेमध्ये या सर्व पालकत्व शैली महत्वाच्या असल्याचे मानले गेले आहे. परंतू सांस्कृतिकदृष्टया या गोष्टींचा अभ्यास केला तर चिनी मुलांमध्ये पालकत्वाची अधिकारवादी शैली आणि मुलांमध्ये निर्माण झालेले चांगले सामाजिक समायोजन यामध्ये परस्पर संबंध असल्याचे दिसून आले आहे. याप्रकारे बुम्रिंड यांच्या संकल्पनेचे समर्थन करण्यात आले आहे. ब्रुमिड (Baumrind's typology) यांनी मांडलेली संकल्पना ही एक युरो अमेरीका संदर्भामधील आहे. यामुळे एशिया मधील देशांमध्ये त्याचा उपयोग होवू शकत नाही. उदा. आपण अधिकारवादी पालकत्व वृत्तीचा स्विकार करु शकत नाही कारण काही संस्कृतीमध्ये ती नकारात्मक स्वरुपात आलेली आहे.

पालकांचे नैतिक वर्तन हे त्यांच्या मुलांच्या बाबतीत एक आशात्मक स्वरुपाचे वर्तन असल्याचे दिसून येते. पालक हे ठरवित असतात की त्यांच्या मुलांनी कोणत्या वयोगटामध्ये कोणत्या प्रकारची कौशल्ये आत्मसात करणे गरजेचे आहे. उदा- विविध औद्योगिक कौशल्ये आत्मसात करणे, उच्च शिक्षणासाठी परदेशामध्ये किंवा घरापासून दूर राहणे इत्यादी. पालकांकडून विभिन्न पूर्व अवधारणात्मक, बोधात्मक आणि आत्मसात कौशल्यपूर्ण गोष्टी याबाबत अनुमान लावण्याचा प्रयत्न केला जातो.

**d. द्विमार्गी पालकत्व : स्वभावाची भूमिका (Parenting is a two-way street: the role of temperament)**

आतापर्यंत आपण विभिन्न संस्कृतीमध्ये मुलांचे पालणपोषण करण्याच्या पालकांच्या प्रवृत्तीमध्ये काही अंशी समानता तर काही अशी भिन्नता यावर लक्ष केंद्रित केले. माता पिता आणि मुलांच्या विषयी आपल्या अनुभवातून हे स्पष्ट होते की, मुलांचा विकास हा पालक त्यांच्याबरोबर कशा प्रकारे व्यवहार करतात यावर अवलंबून असतो. विकास हा दोन्ही बाजुने होणे गरजेचे आहे. ज्यामध्ये पालक आणि मुलांच्यामध्ये सुसंवाद हा महत्वाचा मानला गेला आहे. मुलांमध्ये त्याच्या जैविक प्रवृत्तीच्या कारणास्तव काही प्रकारे व्यवहार करण्यासाठी प्रयत्न केले जातात पण पालकांच्या प्रतिक्रिया तसेच अन्य पर्यावरणीय घटकांच्या बदला बरोबर मुलांमधील वर्तन बदलताना दिसतो. पालकांच्या विभिन्न शैलीनुसार शिशू स्वभावाच्या भूमिकावर विचार करणे गरजेचे आहे.

आपण बऱ्याच पालकांकडून आपल्या मुलाबाबतच्या गोष्टी ऐकत असतो. मुलांच्या स्वभावाबाबत पालकांकडून गुणगान केले जाते आणि हा एक चांगला स्वभाव आहे. मनोवैज्ञानिकांसाठी हा जगाशी संवाद साधण्यासाठी जैविक दृष्ट्या आधारित शैलीचा एक भाग आहे (Matsumoto & Juang, २००४). पालकत्वाच्या तसेच स्वभावाच्या भिन्न शैलीमध्येही फरक केला गेला आहे. सोपे Easy : प्रतिसाद आणि भावनांमध्ये सुसंगत, जुळवून घेण्यायोग्य अवघड Difficult : विसंगत, मूड, तीव्र मस्त Cool : अवघड गोष्टींमध्ये पहिल्यांदा माघार घेणे, परिचयासह प्रतिसाद देणे.

पालकांच्या प्रतिसादाबरोबर, या शैलींमुळे मुलांचा मानसिक विकास चांगला होतो. स्वभावामधील भिन्नता या काही प्रतिक्रिया तसेच जैविक पुर्वग्रह यापेक्षा वेगळया नसतात. पालक आणि पर्यावरणीय घटक यामुळे मुलांच्या जीवनामध्ये काही प्रमाणात बदल घडत असतो. यापेक्षा वास्तव रुपात संस्कृती समान रुपाने अनुकूल होत असते. एखाद्या मुलाला वेगळया स्वभावाचे लेबल लावले जाते, वास्तवात काही परिस्थितीमध्ये सकारात्मक विचारांचा लाभ होतो तर काही परिवारामध्ये इच्छापूर्तीला सदैव राखण्यासाठी एखाद्या मुलांना खुप परिश्रम करावे लागते. पालकत्वाची शैली आणि मनाला येईल तसे वागणे हे दोन असे घटक जे मुलांच्या विकासावर मोठ्या प्रमाणात परिणाम करतात.